जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५८६ दिनांक -२८/०७/२०२३**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

## कामगार महिलांना काम देतो असे सांगुन लुटणा-या टोळीस केली अटक

दि.२४/०६/२०२३ रोजी फिर्यादी व त्यांचे सहकारी यांना चार अनोळखी इसमांनी आमच्या सोबत कामासाठी चला असे सांगून रोडवर चालणा-या प्रवासी चार चाकी गाडीतून जुन्या कात्रज बोगदयाचे पलीकडे घेऊन जाऊन प्रवासी गाडीतुन उतरुन डोंगराकडे जाणारे कच्या रस्त्यावर घेऊन जाऊन फिर्यादी व त्यांचे सहकारी यांचे अंगावरील सोन्याचे दागिणे व मोबाईल हॅन्डसेट रोख रुपये असे ७६,०००/- रुपयांचे ऐवज जबरदस्तीने चोरुन नेले म्हणून फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ४५८/२०२३, भादंवि कलम ३९२,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्हयाचे तपासामध्ये सदरचा गुन्हा आरोपी नामे **१) नितीन साहेबराव चव्हाण, वय ३०वर्षे,रा.कांबळे बाई यांच्या बिल्डींग मध्ये भाडयाने, सहयोग नगर, विठठलनगर,वारजे माळवाडी, पुणे मुळ रा. तामसा रोड, कृष्णानगर, गल्ली नंबर ५, ता. आर्धापुर, जि. नांदेड २) संतोष नागोराव कानोडे,वय २० वर्षे, रा.सदर मुळ रा. मारुती मंदिरा शेजारी, आहिल्यादेवीनगर, ता. आर्धापुर,जि.नांदेड ३)सुकलाल बाजीराव गिरी,वय १९ वर्षे,रा.सदर मुळ रा.तामसा रोड, कृष्णा नगर, गल्ली नंबर ५, ता.आर्धापुर, जि. नांदेड ४) सुनिल नारायण गिरी, वय १९ वर्षे, रा. सदर, मुळ रा. तामसा रोड, विवेकगर, कॅनल जवळ,ता.आर्धापुर, जि.नांदेड** यांनी केला असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना नमुद गुन्हयामध्ये अटक करुन त्यांचे कडुन गुन्हयातील चोरी केले दोन सोन्याचे मंगळसुत्र, दोन जोड कानातील फुले असा एकुण ७६,०००/-रु.चा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुकत, पश्चिम प्रादेशीक विभाग, पुणे शहर श्री.प्रविणकुमार पाटील,मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ २,पुणे शहर श्रीमती स्मार्तना पाटील मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे श्री. नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.विजय कुंभार,पोलीस निरीक्षक(गुन्हे) विजय पुराणिक, गिरीषकुमार दिघावकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल रसाळ,पोलीस अंमलदार शैलेश साठे, मंगेश पवार, निलेश खैरमोडे, सचिन सरपाले, चेतन गोरे, निलेश ढमढेरे, हर्षल शिंदे, अभिजीत जाधव, अवधुत जमदाडे,सचिन गाडे,धनाजी धोत्रे,अभिनय चौधरी,अशिष गायकवाड, राहुल तांबे, विक्रम सावंत यांच्या पथकाने केली आहे.


भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन
पुणे शहर
पुणे पोलीस